आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार, दिनांक ०८ जून २०२३

ठळक बातम्या

- पंतप्रधाननरेंद्र मोदी यांचा अमेरिका दौरा भारत अमेरिका संबंधांना समृद्ध करणारा ठरेल, असं भारत प्रशांत क्षेत्राचे उच्च पदस्थ कर्ट कॅँम्पबेल यांचं मत.
- रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचं द्वैमासिक धोरण जाहीर / रेपोदरात कुठलाही बदल न करण्याचा निर्णय.
- राष्ट्रीय महामार्ग क्रमांक **44** च्या उधमपूर-रामबाण विभागातला जैसवाल पूल पूर्ण झाला असल्याची, केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांची माहिती.
- आंतरराष्ट्रीयपौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त तृणधान्याचे क्षेत्र आणि उत्पादनात वाढ करण्यासाठी वर्धा जिल्ह्यात या धान्याच्या 1 लाख 11 हजार मिनीकिट्सचेवाटप करण्यात येणार.

********

<u>अमेरिका दौरा</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आगामी अमेरिका दौरा भारत आणि अमेरिकेच्या संबंधांना आणखी समृद्ध  करेल, असं भारत - प्रशांत क्षेत्रासाठीचे जो बायडेन सरकारचे उच्च पदस्थ, कर्ट कॅँम्पबेल यांनी म्हटलं आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातला विश्वास आणि दृढ संबंध सध्याचे नसून दशकापुर्वीचे असल्याचंही ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या दौऱ्याबद्दल ते म्हणाले की, जागतिक पटलाच्या पार्श्वभूमीवर हा दौरा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या भेटीमुळे गुंतवणूक आणि लोकांच्या एकमेकांबरोबरच्या संबंध वाढीला चालना मिळेल, असंही कॅँपबेल म्हणाले. भारत- अमेरिका तंत्रज्ञान क्षेत्रातल्या भागीदारीवर ते म्हणाले की, आमच्या विद्यापीठांनी अभियंते आणि तत्रज्ञांना आणखी प्रशिक्षण देण्याची गरज आहे. जागतिक पटलावर भारताच्या गंभीर भूमीकेचं सगळ्या जगानं कौतूक केलं असल्यावर त्यांनी भर दिला. अमेरिकेच्या दोन्ही सभागृहाला संबोधीत करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे भारताचे पहिले पंतप्रधान आहेत.

<u>रिझर्व बँक</u>

भारतीय रिझर्व बँकेनं चालू आर्थिक वर्षातील द्वैमासिक पतधोरण  आज जाहीर केलं. अपेक्षेप्रमाणे बँकेने व्याज दरात कुठलाही बदल केला नाही. धोरण आढाव्याची घोषणा करताना, **RBI** गव्हर्नर शक्तीकांत दास म्हणाले की, चलनविषयक धोरण समितीने पॉलिसी रेपो दर **6** पूर्णांक **5** दशांश टक्के अपरिवर्तित ठेवण्याचा निर्णय घेतला तर स्थायी ठेव सुविधा अर्थात **SDF** दर **6** पूर्णांक **25** शतांश टक्के कायम ठेवला. पुर्वीच्या **6** पूर्णांक **75** शतांश टक्क्यांचा सीमांत स्थायी सुविधा आणि बँक दरात कोणताही बदल करण्यात आला नाही.  एमपीसीच्या सहा सदस्यांपैकी पाच सदस्यांनी

बहुमताने हा निर्णय घेतला की वाढीला पाठिंबा देताना महागाईवर लक्ष केंद्रित करून ती बरोबरीने ठेवली जाईल. **RBI** गव्हर्नर म्हणाले की, मार्च-एप्रिल **2023** दरम्यान भारतातील ग्राहक किंमत महागाई कमी होऊन ती ६ पूर्णांक ७ दशांश टक्क्यांपर्यंत खाली आली.तथापि, ताज्या आकडेवारीनुसार मुख्य चलनवाढअजूनहीठरविलेल्या उद्दिष्टापेक्षा जास्त आहे. आणि **2023-24** च्या आमच्या अंदाजानुसार या चलनवाढीत कुठलाहीबदल होणार नाही.ते म्हणाले की आमच्या मूल्यांकनानुसार **2023-24** मध्ये महागाई **4** टक्कयांच्या वर राहील. शक्तीकांत दास म्हणाले की, सर्व घटकांचा विचार करून आणि सामान्य मान्सून गृहीत धरल्यास, **CPI** चलनवाढ **2023-24** साठी **5** पूर्णांक **1**दशांश टक्के राहण्याचा अंदाज आहे.त्यांनी दोन हजारांच्या नोटा बँकेतून काढण्याबाबत सांगितलं की, मे च्या तिसऱ्या आठवड्यापासून चलनातील घट आणि सरकारी खर्चात वाढ यामुळे प्रणालीतील तरलता वाढली आहे. आरबीआयचे बाजार कामकाज आणि बँकांमध्ये मोठ्या प्रमाणावर दोन हजार रुपयांच्या नोटा जमा झाल्यामुळे या तरलतेत आणखी वाढ झाली आहे.

<u>मोहीम</u>

दहशतवाद आणि फुटीरतावादाला चालना देण्यासाठी वापरण्यात आलेल्या जम्मु काश्मीर मधल्या ८६ ठिकाणच्या १२४ मालमत्ता जप्त करण्यासाठी एसआयए आणि जम्मू काश्मीर पोलिसांच्या कायदेशीर मोहिमेला आज सुरूवात झाली आहे. राज्य तपास संस्था अर्थात **SIA** आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांच्या कार्यकारी गटानं राज्यविरोधी कारवाई संबंधित सरकारच्या शून्य सहिष्णुतेच्या धोरणाशी सुसंगत, दहशतवाद निधीच्या विरोधात कायदेशीर चौकट विस्तृत केली आहे. बेकायदेशीर क्रियाकलाप प्रतिबंध कायदा अर्थात **UAPA** च्या कलम **8** आणि कलम **25** अंतर्गत **SIA**,पोलिस कार्यकारी शाखा आणि संबंधित न्यायालयांनी या कलंकित मालमत्ता जप्त करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे.

<u>अन्न सुरक्षा</u>

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने जागतिक अन्न सुरक्षा दिनानिमित्त विज्ञान भवन इथं काल एक संवादात्मक सत्राचं आयोजन केलं होत. या कार्यक्रमाला केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री डॉ.मनसुख मांडविया उपस्थित होते.विविध राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या कामगिरीची दखल घेऊन, डॉ.मनसुख मांडविया यांनी २०२२-२३ या वर्षाच्या क्रमवारीच्याआधारे विजेत्यांचा सत्कार केला. या क्रमवारीत मोठ्या राज्यांमध्ये मध्ये केरळ अव्वल स्थानी असून त्यानंतर पंजाब आणि तामिळनाडू राज्यांनी स्थान मिळवलेआहे.यावेळी विविध जिल्हयांसाठी इट राइट चॅलेंज-टप्पा२ च्याविजेत्यांचा मांडविया यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यात उत्कृष्ट निकालअसलेले बहुतांश जिल्हे हे तामिळनाडू, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातले आहेत.

<u>गीतांजली अय्यर निधन</u>

दूरदर्शन आणि आकाशवाणीच्या पहिल्या इंग्रजी भाषेतल्या वृत्तनिवेदक गीतांजली अय्यर यांच्या निधनाबद्दल माहिती प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकुर यांनी शोक व्यक्त केला आहे. अय्यर यांनी बातम्यांमध्ये विश्वासार्हता सोबतच एका विशिष्ट आवाजानं पत्रकारीता आणि प्रसारण जगतात एक विशिष्ट ओळख बनवली होती असं मंत्री ठाकूर यांनी आपल्या शोक संदेशात म्हटलं आहे. अय्यर यांचं काल नवी दिल्लीत निधन झालं, त्या ७६ वर्षांच्या होत्या.

केंद्रीयमंत्रीनितीन गडकरी

जम्मू- काश्मिर इथल्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक **44** च्या उधमपूर **-** रामबाण विभागातल्या चेनाब नदीवरील **2** मार्गिका असणारा जैसवाल पूल पूर्ण झाला असल्याची माहिती केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी आपल्या ट्वीटच्या माध्यामातून दिली. **118** मीटर लांब असणारा हा पूल वास्तुकलेचा उत्कृष्ट नमुना असल्याचं त्यांनी आपल्या ट्वीट मध्ये म्हटलं आहे.या पूलाच्या बांधकामासाठी **20** कोटींचा खर्च आल्याचं त्यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील केंद्र सरकार जम्मू-काश्मिरच्या रस्ते आणि महामार्ग विकासासाठी वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले. जम्मू **-** काश्मिरच्या पायाभूत सुविधांमुळे केवळ आर्थिक विकासच नाही, तर पर्यटनाला देखील चालना मिळेल असा विश्वास गडकरी यांनी व्यक्त केला.

तृणधान्य

आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त तृणधान्याचे क्षेत्र आणि उत्पादनात वाढ करण्यासाठी वर्धा जिल्हयात या धान्याच्या 1 लाख 11 हजार मिनीकिटचे वाटप करण्यात येणार आहे. या किटचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कृषि विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केल्याप्रमाणे 2023 हे वर्ष राज्यात आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष 2023 म्हणून साजरे केले जात आहे. त्यानुषंगाने जनतेमध्ये या धान्याची जाणीव जागृती करण्यात येत आहे. लोकांना मुबलक प्रमाणात व कमी किंमतीत तृणधान्य उपलब्ध व्हावे यासाठी तृणधान्याच्या क्षेत्रात व उत्पादनामध्ये वाढ करण्यात येणार आहे. या वाटपामध्ये शेत तिथे पौष्टिक तृणधान्य मोहिमेंतर्गत खरीप ज्वारी, बाजरी, राळा, कोदो व राजगिराच्या एकूण 1 लाख 10 हजार 238 किट्सचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. यातून उत्पादित धान्य शेतकऱ्यांच्या कुटुंबाला वापरता येणार आहे.याशिवाय यातून बियाणे तयार करून पुढील वर्षी शेतकऱ्याना त्याचा वापर करता येणार आहे.यामुळे तृनधान्याचे बियाणे घरीच तयार करता येणार आहे.

गोसेखुर्द

पावसाळयातवेळोवेळी होणाऱ्याअतिवृष्टीमुळे भंडाराजिल्हयातील गोसेखुर्द धरणातील पाण्याचा विसर्ग करण्यात येतो. मान्सूनचे आगमन होण्याबाबतचे हवामानखात्याचे संकेत असून सततच्या पावसामुळे धरण क्षेत्रातील पाणी पातळी वाढत असते. त्यामुळे धरणातून विसर्ग सोडतांना किमान **4** तास पूर्वी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाला

माहिती देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.काल पवनी तालुक्यातील गोसेखुर्द प्रकल्प कार्यालयाला त्यांनी भेट दिली.यावेळी प्रकल्पातील पाण्याची महत्तम पातळी तसेच प्रकल्पातील पाणी व्यवस्थापनाची माहिती त्यांनी जाणून घेतली. त्याचबरोबर भंडारा ते गोसेखुर्द धरण दरम्यान पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण करणाऱ्या संभाव्य बाबी व ठिकाणांची पाहणी करण्याची सूचना कुंभेजकर यांनी दिली.

शासन आपल्या दारी

नागरिकांना सर्व विभागाच्या योजनांची माहिती आणि त्यासाठीचे अर्ज गावातच उपलब्ध व्हावं, तसंच दैनंदिन कामासाठी लागणारे महत्वाचे दाखले, गावातच उपलब्ध करून देण्याच्या उद्देशानं शासनानं "शासन आपल्या दारी" हा उपक्रम सुरू केला आहे. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांनी जीवन सुकर करण्यासाठी आवश्यक योजनांसाठी नोंदणी करावी, तसंच दाखले उपलब्ध करुन घ्यावेत,असं आवाहन यवतमाळचे जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केलं. "शासन आपल्या दारी" उपक्रमांतर्गत आज यवतमाळ तालुक्यातील आकपुरी, आर्णी तालुक्यातल्या लोणबेहळ, कवठा बाजार सुकळी, महागाव तालुक्यातील मुडाणा, भोसागावांमध्ये शिबिर आयोजित करण्यात आलं होते. आकपुरी इथल्या विभागांचा समावेश होता.

हवामान

विदर्भातील अकोला, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यात काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह हलक्या गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.

******